स्थापना : दि. ५ मे, २००८
नों. क्र. महा./२४९२९/को./११/०७/०८

॥ सामर्थ्य मायमराठीचं ॥
॥ विकसन MY बोलीचं ॥

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित त्रैमासिक
(Peer Reviewed Refered Research Journal )
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-चौथे : अंक सातवा । जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६



Scanned by CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Refered Research Journal )

ISSN No. 2319-6025

**वर्ष-चौथे : अंक सातवा**

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. अरुण शिंदे**

संपादक मंडळ

**डॉ. शिवाजी पाटील, डॉ. नंदकुमार मोरे,**
**डॉ. गिरीष मोरे, डॉ. उदय जाधव**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. प्रकाश कुंभार,**
**डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय
८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ५०/-

Scanned by CamScanner

# अंतरंग


वाङ्मयप्रवाहाची संकल्पना / डॉ. श्यामसुंदर मिरजकर ३

रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छिमार कोळी समाजाचा
समाजभाषावैज्ञानिक अभ्यास / प्रा. डॉ. अरुण शिंदे १२

मुस्लिम कवींची अभिव्यक्ती / डॉ. राजेखान शानेदिवाण २२

रंगराव बापू पाटील यांच्या कथेतील नायकांचा
मनोविश्लेषणात्मक अभ्यास / प्रा.डॉ. सुभाष गणपती जाधव २८

समकालीन मराठी कविता / प्रा. यशवंत मारूती चव्हाण ३७

'स्त्रीवाद' : प्रवाह आणि भूमिका / प्रा. डी. जे. दमामे ४३

१९६० नंतरच्या मराठी कादंबरीतील
प्रयोगशीलता / डॉ. माधव मारूती भोसले ५०

शाहीर राजा पाटील यांची गण,
गवळण आणि लावणी / प्रा. आबासाहेब शामराव शिंदे ५६

जागतिकीकरण आणि ग्रामीण कथा / प्रा. डॉ. दादाराव गुंडरे ६४


**सूचना :** पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या मतांशी संपादक मंडळ वा शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ सहमत असतीलच, असे नाही.




ISSN No. 2319-6025



Scanned by CamScanner

# रंगराव बापू पाटील यांच्या कथेतील नायकांचा मनोविश्लेषणात्मक अभ्यास

**प्रा.डॉ. सुभाष गणपती जाधव**
दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

मराठी साहित्यात अनेक लेखकांनी दर्जेदार अशा ग्रामीण कथांचे लेखन केले आहे. त्यापैकी एक लेखक म्हणजे रंगराव बापू पाटील हे होत. त्यांनी अनेक कथासंग्रहांचे लेखन केले आहे. या कथासंग्रहातून त्यांनी विविध विषयांची कथाबीजे घेऊन कथा लिहिल्या. म्हणजेच विविध प्रकारच्या कथांचे लेखन त्यांनी केले. त्या कथानकांमध्ये माणसाच्या मनाचे मनोविश्लेषणात्मक चित्रण करणारी कथाही लिहिली. मानवी मनाची संकल्पना ही आजपर्यंत स्पष्ट करता आलेली नाही. तरीही मन आहे हे आपण नाकारत नाही. या मनाचा धागा धरुनच मनोविश्लेषणात्मक कथा अवतरते. या मनाचे चित्रण व होणारी व्दिधा मनस्थिती काही कथांच्या माध्यमांतून केला आहे.

जोगवा (ल्हावर) या कथेत एका गुरुजीच्या मनाची चंचलता लेखकाने रेखाटली आहे. घरच्यांच्या म्हणण्यानुसार गुरजींनी एका काळ्या स्त्रीशी लग्न केले. गुरुजींना ती आवडत नसते. एक दिवस गुरुजींच्या दारात जोगवा मागण्यासाठी 'कलाबाई' जोगतीन येते. या दिवसापासून गुरुजी तिच्या प्रेमात पडतो. ती दिसायला सुंदर, देखणी, डोळ्यात काजळ घातलेली, हिरव्या साडीत खुलून दिसणारी होती. तिला पाहिल्यापासून गुरुजींच्या मनात चक्रे सुरु होतात. आपण एक दिवस दिला पन्हाळ्याला फिरवून आणू असे तो स्वप्न रंगवितो. गुरुजी तिच्याबरोबर स्वप्नात बोलू लागतो. कधी कधी त्याला जुन्या आठवणी आठवतात. एक दिवस धाडस करुन गुरुजी जोगतिणीच्या घरी जातो. आपल्या मनातील विचार तिला सांगावा असे वाटते पण सुरुवात कोठून करावी. असा प्रश्न पडतो. या विचारात तो गुंतून जातो व म्हणतो...

"काय म्हणाव बरं? तू गोड दिसतेस म्हणावं, की तू आवडतेस म्हणावं ? तुझ्या पाठीची पन्हाळ आवडते म्हणावं की सप्तरंगी गोंडा भुलवतो म्हणाव ? काय बोलावं ? कशी सुरुवात करावी ?"[१]

या विचारात असतानाच ती त्याला चहा आणून देते. चहा घेताना पुन्हा डोक्यात विचारांचे वादळ सुरु होते. ती उद्या आळत्याला गिरीलाल बरोबर जाणार असल्याचे गुरुजींना सांगते. हे एकताच आपले पारडे चुकले असे त्याला वाटते. त्यावेळी तो म्हणतो.


ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

"झोच्यायला, काय सुचलंच न्हाय नीट बोलायचं. जरा कोड्यात बोलून वळणावर आणाय पाहजे हुत..."[२]

शेजारच्या वालूबाईच्या पोराला शाळेत पाठवून द्या असं सांगून गुरुजी जोगतिणीच्या घरातून निघून जातात. गुरुजींच्या मनात पत्नीविषयी तिरस्कार आणि सुंदर असणाऱ्या कलाबाई जोगतिणीविषयी निर्माण झालेली ओढ किंवा आकर्षण या मनातील व्दंदाची स्थिती येथे वर्णन केली आहे. म्हणून या कथेविषयी डॉ.स.ग.यादव म्हणतात -

"मास्तराचे असे व्हायला नको होते. अस वाटत राहते. कथा संपते ती लेखकाच्या दृष्टीने वाचकाच्या दृष्टीने नव्हे. तर ती कथा सुरु होते."[३]

याठिकाणी एक समाज घडवणारा आदर्श माणूसुध्दा काही वेळा मनातील व्दंव्दामुळे अधोगतीला कसा जाऊ शकतो याचे चित्रण लेखक मनोविश्लेषणात्मक पातळीवर करताना दिसतो.

दिंडी (ल्हावर) या कथेत आप्पाच्या पोराला त्याची आई देवाघरी गेली आहे असे सांगितल्याने तोआपल्या आईची वाट बघत असतो. त्याच्यां बालमनात चाललेले युध्द या कथेत येते. विठ्ठलाच्या गजरात दिंडी पुढे पुढे येऊ लागते. सोनाप्पाच्या (आप्पा) पोराच्या कानावर दिंडीतले येणारे टाळ गजरांचे आवाज ऐकू येतात. तसं ते पोर बाहेर येते व सोनाप्पाला विचारते. 'आई येणार दिंडीतनं?' सोनाप्पाची बायको देवाघरी गेलेली. या लहान मुलाला तुझी आई दिंडीतून गेली आहे असे सांगितलेले असते. त्यामुळे दिंडी येताच तो आनंदून जातो. दिंडी जशी देवळाबाहेर येवू लागते तसे गजरांचे आवाज स्पष्ट ऐकू येतात. सोनापाची आई घरातून दातव्हट खात पांगिऱ्याकडे येते. तिचा अवतार चित्रविचित्र असतो. ती कमरेत वाकलेली असते. पोराजवळ येते त्याच्या मानगुटीला धरून उचलून घरात नेते आणि पोराला म्हणते.

"आमी मेलोय व्हय रं...बाच्या मयाचा... "[४]

पोरगं केकाटतं आणि आजीच्या धाकानं आतल्या आत हुंदके देत बसून राहते. म्हातारीचं बडबडणं चालूच असतं. ती सोनापाला म्हणते. -

"तेला याड लागलंय याड.... दुसरी कर की, का तिलाच तेवढं सोनं लागलं हुतं!"[५]

या म्हातारीच्या उद्‌गारातून सुनेविषयीचा तिटकारा लक्षात येतो. सोनापा मात्र आपल्या पत्नीच्या आठवणीतच दिवस काढत असतो. तर त्याचं पोरगं पक्या आपल्या आईच्या येण्याच्या प्रतिक्षेत जगत असतं. आपली आई येणार म्हणून आनंदाने मोहरुन जाते. त्याच्या बालमनात कालवाकालव सुरु होते. पक्या झोपलेला उठून बसतो आणि आईवर खूप रागवायचं ठरवितो.

एकूणचं काय तर या कथेतून आप्पाचं मन व पक्याचं मन याची झालेली विचित्र अवस्था दिसून येत. की कथा थोडी धार्मिक असली तरी ती मनोविश्लेषणाच्या पातळीवर उतरणारी आहे. दिंडी या कथेविषयी महादेव मोरे लिहितात.

''२-३ पानांच्या मोजक्याच आवाक्यात व नेमक्या शब्दात ही कथा समर्थ कथा लिहिलीया. रंगराव पाटलांनी बालमनाचे चित्रण करणाऱ्या ज्या मोजक्या कथा मराठी साहित्यात आहेत त्यात दिंडीचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. अशा तोलामोलाची ही कथा आहे.''[६]

या कथेत आपली पत्नी मेली आहे. असं नायकाला वाटत नसतं तसं त्याचं मन मानत नसते. तर पक्या लहान असल्याने त्याला आपानं त्याची आई दिंडीतून गेली असे सांगितलेले असते. त्यामुळे ते बालमन आपल्या आईचा शोध दिंडीत घेताना दिसते.

मत्तर (ल्हावर) या कथेत बायजा त्या गारुड्याला बघायला येते आणि देहभान हरपून जाते. तिच्या मनाची घालमेल होते. या तिच्या मनाचे वर्णन करताना लेखक लिहितो.-

''तिनं पाण्यात चेपल्या घातल्या आणि समोर आली गारुड्याची आणि तिची नजरानजर झाली. धामणीच्या नजरेनं जनावर घायाळ व्हावं तशी ती घायाळ झाली. मन चरकलं आणि त्याच क्षणी तिच्या डोक्यातून भनऽऽऽ करुन काहीतरी उडालं. म्हवाच्या मशागत आणि तिला वाडा फिरतोय असं वाटू लागलं गारुडी पण फिरु लागला. काळं आंगराक. काळी टोपी.... बुटी....पुंगी....सगळच फिरु लागलं. चाळ वाजू लागलं. झोळी जवळचं हाडकाचं भेंडोळ पाहून ती पाक गळून गेली.''[७]

या विधानातून बायजाच्या मनाची चंचलता दिसते आणि दुसरीकडे काळी टोपी-बुटी-पुंगी व हाडं बघून अंधश्रध्दा कशी स्थिरावली जाते. याचे चित्रण दिसते. शेवटी याच मनस्थितीत बायना आपला प्राण देते.

मानवी मनाचा ठाव घेणारी कंदील (ल्हावर) कथा आहे. कुसुमी डोक्यावर धुण्याचं बोचकं घेवून तरातरा पायवाटेनं चाललेली. ती चालत असतानाच वारा तिच्या कानाशी भुरभुरतो कुजबुजतो कुरळे केस उडवितो. आणि लगट करुन विचारतो.-

''आज सारा दिवस मळ्यातच काढलास? हाऱ्या भेटला''[८]

या बोलण्याने ती लाजते दिवस बुडतो संधिप्रकाश रेंगाळतो. या वातावरणात ती बेभान होवून चालत असते. नकळतपणे तिच्या मनात हऱ्याच्या विषय उचंबळून येते. तिचं मन विचार करु लागते. विचारांच्या खाईत बुडून जाते. हाऱ्याशी घेतलेली केळीच्या झाडाखालची भेट तिला आठवते. सारे क्षण ती टिपून घेत असते. एवढ्यात


ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

तिच्या मनात सोनाराच्या शाबीचा विषय येतो. शाबीनं कामाला असलेल्या गड्यावर प्रेम केलं आणि ती त्याचा हात धरुन गेली. ती धाडशी होती. असं आपल्याला कसं जमलं. असाही एक विचार तिच्या मनात येतो. पुन्हा दुसरा विचार येतो की, आनंदीसारखं नाही झालं म्हणजे मिळवलं ऐनवेळी तिला तिच्या प्रियकरानं सोडून दिलं. ती एकटी पडल्याने मरणाचे विचार तिच्या मनात सारखे येत असतात. अशा दोन्ही स्त्रीयांच्या बाबतीत कुसुमच मन विचार करीत असतं. त्या विचारातच ती झपझप चालत असते. यावेळी एक कंदिल जवळ येताना तिला दिसतो. कंदील जवळ येतो आणि कुसुमजवळ थांबतो. तो आबा असतो. घरी यायला उशीर झाला म्हणून आबा तिला घेऊन जाण्यासाठी येतो आबा भेटल्यावर दोघेही लगालगा चालू लागतात. तिला मोकळं वाटू लागतं. जणू पायातून साखळी काढून ठेवल्यागत सगळी चित्र दूर होतात. शेवटी तिच्या मनाची चंचलता ही तशीच राहते. लेखकाने शेवटच्या वाक्यात पुन्हा सांगितलं आहे. लेखक म्हणतो.-

''आभाळाच्या निळ्या काचेच्या कोक्यात चंद्रज्योत तेवत असते आणि काचेतून चांदण्या हसत असतात.''[९]

शेवटी कुसमी आपल्या मनाचा विचार पक्का करु शकत नाही. पळून जावं की नको या विचारातच ती घरी जाते.

कैची (भोवरा) या कथेत. चंदर मनोविश्लेषणात्मक पातळीवर पूर्णपणे उतरताना दिसते. कथेच्या शेवटी चंदर कैचीत सापडतो तो निर्णय घेवू शकत नाही. चंदरचं एका विधवा स्त्रीवर (बाईवर) प्रेम असतं. तो तिला मळ्यात आणून ठेवण्याचा विचार करीत असतो. आज चांद उगवल्यावर तिकडं सिताफळीच्या झाडाखाली तू ये. मी तुझी वाट बघतो असे तिने चंदरकडून वचन घेतलेले असते. त्यामुळे दुसरा कोणताही विचार चंदरच्या डोक्यात नसतो. आपण तिला आणायची अणि मळ्यात ठेवायची. मळ्याची राखणही होईल आणि आपली सोयही होईल त्याचं मन सारख विचारात पडत असतं तो मनाशीच बोलतो म्हणतो.-

''काय, कवासं ये म्हंटलिया?

बरोबर चांद उगवून आल की ये म्हंटलिया.... तिच्या घराच्या भाईर शिताफळीच्या झाडाखाली वाट बघत थांबते म्हंटलिया.

चांगल पाखरु घावलंय बघ.... आता जलमभर सोडू नकं.

त्येताच इचार करतुया.... हे आपल्याला सांभाळायचं निबल काय ? जल्माचं भलं हुईल का वाटुळं?... माणसं चांगल म्हंतेली का थुकतेली?

माणसास्नी काय ? ती तशीच वरडायची.



Scanned by CamScanner

बाई काढून आणली म्हणून भावकी वरडायची झालं

तिची तुझ्यापाशी न्हायची तयारी हाय नौका?

व्हय लईदीच्या धरनं मागं लागलीया... पण मीच चालढकलीवारी चालीवलय.... पण काल रात्री तिनं वचनच घेतलं..... कंच्याबी परिस्थितीत न्ह्याच म्हंतीया''[१०]

या विचारात असतानाच रामा येतो व त्याची तंद्री भंग पावते तो त्याच्या सोबत जाण्यास निघतो. जात असताना रामा चंदरला खूप समजावून सांगतो पण चंदरची ऐकण्याची तयारी नसते. पण जेव्हा बहिणीच्या विषयी रामा चंदरला बोलतो तेव्हा त्याला पटतं आणि बाईला आपण आणलं तर आपल्या बहिणीशी कोण लग्न करणार नाही. हा प्रश्न त्याला पटतो तो यावेळी कैचीत सापडतो एकीकडे ती बाई आणि दुसरीकडे स्वत:ची बहिण यामुळे तो विचारांच्या काहूरात सापडतो. डोक्याला हात लावून गुडघ्यात मान खुपसून खाली बसतो. त्याला निर्णय घेता येत नाही. त्याच्या मनाची व्दिधा अवस्था होते. त्याच्या मनात असूनही तो त्या बाईला आणू शकत नाही. ही त्याच्या मनाची कैची लेखकाने मांडली आहे. म्हणूनच या कथेच्या संदर्भात नंदा सुर्वे लिहितात.

''कैची ही कथा प्रेमळ वातावरणातली तिचा जीव हाय माज्यावर...माजाबी.... असं म्हणणारा चंदर तिला ठेवण्याचा मनोदय करता असतो. बराच काळ तो स्वप्नरंजनात गुंग असतो. ज्या भविष्यकाळात डोकावण्यात खूपच खूष होवून जातो पण त्याचा मित्र हितचिंतक होऊन त्याच्या या खुशीपासून परावृत्त करतो. बहिणीच्या लग्नाची समस्या करु नकोस असा सल्ला त्याला देतो. चंदरपुढे खरच पेच पडतो. अखेर माणसाला कुटुंबाभिमुख समाजभिमुख व्हावच लागतं आपल्या आवडी निवडीवर फुल्या माराव्या लागतात.''[११]

या ठिकाणी नंदा सुर्वे यांचे मत योग्य असल्याचे पटते कारण चंदरला आपल्या निवडीवर शेवटी फुली मारावी लागते.

जोडणी (भोवरा) कथा शेतकी जीवनाशी जवळीक साधणारी पण मनोविश्लेषणाच्या टप्प्यात उतरणारी कथा म्हणून उल्लेख करता येते. दत्तू माळीच्या मनाची झालेली विचित्र अवस्था येथे महत्वाची आहे. दत्तू माळीच्या शेतात चांगल पांढरं शिप्पुर तांदूळ टच्च भरलं होतं. भात वाऱ्यावर सुगंध सोडीत होता. त्या वासानं श्वास गच्च व्हायचा आणि जो तो शेतातील पिकाचं कौतुक करायचा. आठ-दहा वर्षात असलं पीक आलं नव्हतं. खंडी-दीड खंडी भात निघणार होतं. त्यामुळे तो आनंदी होता. यंदा दोन-तीन हजाराला मरान नव्हतं आणि किताबी भात खावा. अशी स्थिती होती. दत्तूचं पोरगं मात्र आंदू शेतात लक्ष देत नव्हता. खायचं, दूध प्यायचं आणि गावातनं उनाडक्या करीत

 ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

फिरायचं तरण्या पोरींच्याबरोबर गुळूगुळू बोलत बसायचं त्यामुळं दत्तूला फार काळजी लागलेली. एकीकडे भाताची आणि दुसरीकडे पोराची कारण पाऊस आला तर भात हातचा जाणार आणि गावात नाना प्रकारच्या गोष्ट घडत होत्या. त्यामुळे पोराचं कसं होणारं, दत्तू पोराला जोडणी करण्यासाठी पाठवून देतो. तो वशिकराला दामाला भाऊसाबला आणि दोन तीन इतर गड्या माणसासनी सांगतो मात्र सुगंधाला सांगण्यास विसरत नाही. तो सुगंधाकडे येतो तेव्हा त्याला रसायनांचा वास येतो. तो तिला भात कापायला ये म्हणून सांगतो. तीही येतो म्हणते. तो तिला लवकर ये म्हणून सांगून जातो. दोन पाकल्या जास्त भात मिळणार म्हंटल्यावर सुगंधा लवकरच रानात येण्याचं कबूल करते. आंदू सगळ्यांना सांगून रानात जातो.

इकडे दत्तूला मात्र रात्रभर झोप लागत नाही. पावसाची त्याला भिती असते. त्यामुळे तो मध्येच उठायचा आणि आभाळाकडं बघायचा डोळं फाडून बघायचा. निळभोर आभाळ चांदण्याचा सडा शिंपून खदखदा हसत असलेल दिसायचं आणि त्याला उगचचं खुळ्यात निघाल्यागत वाटायचं पुन्हा त्याचा डुलका लागतोय न लागतोय तोच ढोल बडविल्यावानी पुन्हा आभाळ गरजल्यागत वाटायचं पुन्हा तो डोक्यावरच पांघरुन काढायचा बाहेर यायचा आभाळात चांदण्या लुकलुकलेल्या बघून झोपायचा. यातच त्याला उशीरानं झोप लागते. झोपेतच पाऊस पडून सर्व भाताचं वाटोळं झाल असं स्वप्न पडते. बायको पहाटेच त्याला उठवते तो स्वप्नातून जागा होतो व रानात येतो तर नवऱ्या पाक निजल्यावत्या आणि मोती उधळाव तसं संबंध रानात भात सोडलं होतं. ह्यो धिंगाणा कोणी घातला या विचारात दत्तू रानातून फिरु लागतो. तेव्हा पुढं त्याला हादराच बसतो. आंदू आणि सुगंधा दोघंबी दिसत्यात दोघजण दत्तूला बघताच खाली एकटक बघू लागतात. आंदूचा हात सुगंधीच्या खांद्यावर असतो. हे दृश्य पाहून तो चपापतो. दत्तूचं कुत्र रात्रभर भातातनं धिंगाना घालून शेपटीचा गोंडा हलवीत झुडपाचा वास घेत खालती जातं तेथे एक कुत्री असते. हे पहाताच आंदू सुगंधीला म्हणतो.-

"कशी काय जोडणी केलीया बघ की! "[१२]

एवढ्यात दत्तूचा आवाज आंदूच्या कानावर पडतो. दत्तू आबा म्हणतो.

"तुला तेंची जोडणी दिसली काय ? तिकडं खंडीभर भाताचं वाळवान झालेलं दिसलं न्हाय व्हय तुला ?"[१३]

या कथेत आबाच्या मनात जी भिती होती ती निसर्गाची होती. निसर्गाने साथ दिली पण स्वत:च्या पोरामुळे भाताचं नुकसान होतं. त्याच्या मनातील भिती सत्यात येते. तत्पुर्वी त्याच्या मनाची अस्वस्थता दिसून येते.



Scanned by CamScanner

झांजड (झुली) कथा रामूच्या मनाचा वेध घेणारी कथा आहे. रामू आणि नोकर चंद्या सांज होताच बुधवारचा बाजार करुन गावाकडं निघतात. गाडी वाटला लागते. थोड्या वेळाने यांना थंडी जाणवते. चंद्याला चिलीम ओढायची हुक्की येते. पण मालकासमोर कसं ओढायचं म्हणून तो गप्प बसतो. शेवटी रामूच चंद्याला चिलीम काढायला लावतो. दोघेही झुरके मारतात. चिलीम ओढल्याने त्यांना थोडं बरं वाटतं थोड्या अंतरावर गेल्यावर त्यांना एक बाई दिसते. ते दोघे तिची विचारपूस करतात ती बाई आपल्याच ढालगावला येणार म्हंटल्यावर तिला गाडीत बसवून घेतात न रहावून रामू अंगापिंडान गच्च भरलेल्या त्या बाईकडं बघून कावराबावरा होतो. त्याच्या मनामध्ये नको नको ते विचार येवू लागतात. अंधार, थंडी आणि एकांत या सर्वांचा एक वेगळाच परिणाम रामूच्या मनावर होते. तो भावनेच्या आहारी जावून त्याचे मन पेटून उठते. खसकन तिला जवळ ओढावी असं वाटू लागतं कारण हात पुढे करुन ओढली तर सहज मिठीत घावेल इतक्या जवळ ती बसली होती. रामू चंद्याला फडतऱ्याच्या मळ्यात निरोप देवून येजा म्हणून त्याला पाठवून देतो. इकडे मात्र त्या बाईला वाघाच्या घरात शेळी पाहुणी होवून गेली असं वाटतं ती घाबरते . रामू मात्र अनेक कारणं सांगून मुद्दाम वेळ करीत होता. शेवटी ती चालत जाणार म्हंटल्यावर तो गाडी हाणू लागतो, ह्या बाईशी कसं बोलाव ? काय बोलाव? का एकाएकी तिला जवळचं ओढावी ? काहीच याला सुचत नव्हतं याचं मन व्दिधा स्थितीत असते. त्यामुळे याची मानसिकता ढासळत जाते. त्याला जे काही वाटतं ते सांगताना लेखक लिहितो.

"त्याला वाटलं, ह्या बाईच्या लुसलुशीत गालाचं मुकं घ्यावत, तिचा चेहरा दोन्ही तळव्यात घट्ट धरुन पटापट मुकं घ्यावत, उभार छातीवरची गुबगुबीत रामफळं आपल्या मजबूत छातीवर दाबावीत."[१४]

अशी रामाच्या मनाची अवस्था झालेली असते. न राहवून तो पान खातो आणि तिलाही देतो. नाही नाही म्हणत तीही पान खाते. तिला नंतर भोवळ येते कारण त्यात तंबाखू असते. या माणसाच्या कलानं घ्याव नाहीतर आता भलताच प्रसंग येईल असं तिला वाटतं म्हणनूच ती पान खाते. भोवळे आल्यामुळे ती गाडीतच लोळते आणि पुढं व्हयचं तेच होते. याचा चित्रण करताना लेखक मार्मिक शब्दांची रचना करुन सांगतो. म्हणतो

".... पण रामूने तिच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही. त्यानं तिच्या दोन्ही बाजूने हात घातले आणि एखादं पोतं उचलावं तसं त्यानं तिला कवळ्यात घेतलं... मग लांब कुणाची तरी पावलं वाजली तसा रामू उठला आणि पुढं जाऊन बसला...."[१५]



Scanned by CamScanner

या ठिकाणी रामू स्वत:ची मनातील इच्छा पूर्ण करतो. गाव जवळ आल्याने नोकर बाईला उठवतो. बाई सर्व काही एकत असते पण तसच कलंडून राहव असं तिला वाटत होतं. संपूर्ण शरीर चोळामोळा होऊन गेल्यागत झाले होते. लगुड अस्ताव्यस्त झालं होतं. सगळ अंग एकाएकी रगडून निघाल्यागत झालं होतं. केस विस्कटलेले होते चोळीची बटण जाग्यावर नव्हती. ती हलकेच उठते तेव्हा रामू तिला कुठ जाणार म्हणून विचारतो. तेव्हा ती गारीतला रामू म्हणते बघा त्यास्नी असं म्हणते. हे ऐकताच रामू खाली बसतो. घरी जाताच ती बाई रामूच्या बायकोला बघून जवळ जाते मिठी मारते तो बायकोला ही कोण म्हणून विचारतो तेव्हा ती स्त्री तिची मैत्रिण असल्याचं सांगते. हे ऐकताच रामू पटकन खालीच बसतो. माणसाचं मन एखाद्या काहूरामध्ये आडकलं तर ते ईच्छा पूर्ण केल्याशिवाय गप्प बसत नाही. त्यामुळे रामूही याठिकाणी भावनावश होवून त्या बाईशी एकरुप होतो. आपल्याच पाव्हणीवर आपण वाईट कृत्य केलं याची त्याला जाणीव होते. कोणाचे मन कोणत्या वेळी कोणत्यां थराला, पातळीला जावू शकते याचे उत्तम उदाहरण लेखकाने रामू या व्यक्तीरेखेच्या सहाय्याने दिले आहे.

वरील सर्व कथांचा विचार करता रंगराव बापू पाटील यांची मनोविश्लेषणात्मक कथा माणसाच्या मनाला जाऊन भिडणारी आहे. त्यांच्या कथेतून मानवी मनातील अंतर्भाव उमटताना दिसतात. त्यांच्या कथातील व्यक्तिमनातील भावतरंग लेखक टिपतो. त्याविषयी डॉ.वासुदेव मुलाटे म्हणतात.-

''रंगराव बापू पाटील यांच्या कथेत सामान्यता छोट्या-मोट्या घटना चित्रित केलेल्या असतात. परंतू या घडणाऱ्या, निर्माण होणाऱ्या घटनामुळे कथेतील व्यक्तिरेखांच्या मनात जे भावतरंग उमटतात किंवा ताण निर्माण होतात त्यांचे प्रभावी दर्शन घडते.''[१६]

या मानवी अंतर्मनाचे चित्रण करताना बऱ्याच वेळा लेखक अनेक नैसर्गिक प्रतिमांचा वापर करतो. प्रतिमांच्या मार्फत मानवी मनाचे चित्रण करताना लेखक दिसतो. या नैसर्गिक प्रतिमां वापराबाबत वासुदव मुलाटे म्हणतात.

''मनोविश्लेषणासाठी रंगराव बापू पाटील हे निसर्ग प्रतिमांचा वापर करतात.''[१७]

या प्रतिमा वापरामुळे कथा वाचनीय होते. ती मनाला विचार करायला प्रवृत्त करते. कथा लिहिताना एखाद्या व्यक्तिरेखेच्या खोल मनापर्यंत जावून ती व्यक्तिरेखा चित्रित करणे ही अवघड गोष्ट लेखकाने ग्रामीण पातळीवर सहजासहजी साकार केली आहे. या कथा मानवाच्या मनाचा वेध घेतल्याशिवाय राहत नाहीत. एकूनच काय तर लेखक ग्रामीण विश्व साकारताना मानवी मनाचे विश्लेषण व्यक्त करण्यात यशस्वी



Scanned by CamScanner

झाला आहे. असे म्हणावे लागते. कारण कथा वाचल्यावर शेवटी वाचकाला विचार करायला भाग पाडते. तेथूनच वाचकांच्या मनात दुसऱ्या कथेचा विचार सुरु होते.

**संदर्भ ग्रंथ**


१. रंगराव बापू पाटील : (ल्हावर) जोगवा प्रकाशक सौ.आशा वि जयळकर, नवसाहित्य प्रकाशनः २१, चर्चस्ट्रिट कॅम्प, बेळगाव, प्रथम आवृत्ती २ ऑगस्ट १९७८ पृष्ठ.१७

२. रंगराव बापू पाटील (ल्हावर) जोगवा, उनि. पृष्ठ १८

३. डॉ.स.ग.यादव : ग्रामीण कथा लक्षणीय भर ल्हावर नवसंदेश दि.२३ ऑक्टोबर १९८० कात्रण.

४. रंगराव बापू पाटील : (ल्हावर) दिंडी, उनि. पृष्ठ ६०.

५. रंगराव बापू पाटील : (ल्हावर) दिंडी, उनि. पृष्ठ ६०.

६. महादेव मोरे : (ल्हावर) रसरशीत कथासंग्रह नोव्हेंबर १९७९

७. रंगराव बापू पाटील : (ल्हावर) मत्तीर, उनि. पृष्ठ ९४.

८. रंगराव बापू पाटील : (ल्हावर) कंदिल, उनि. पृष्ठ १४७

९. रंगराव बापू पाटील : (ल्हावर) - कंदिल, उनि, पृष्ठ १५२

१०. रंगराव बापू पाटील (भोवरा) कैची, प्रकाशक- सुनिल अनिल मेहता. मेहता पब्लिशिंग हाऊस १२१६, सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९२, पृष्ठ १८

११. सुर्वे नंदा - मर्यादेत गरगरणारा भोवरा महाराष्ट्र टाईम्स २३ जानेवारी १९९४

१२. रंगराव बापू पाटील : (भोवरा) जोडणी, उनि पृष्ठ११२

१३. रंगराव बापू पाटील : (भोवरा) जोडणी, उनि. पृष्ठ ११२

१४. रंगराव बापू पाटील : (झुली) झांजड, प्रकाशक पारख प्रकाशन आश वि.जवळकर, २१ चर्चस्ट्रीट कॅम्प, बेळगाव ५९० ००१ प्रथमावृत्ती - १५ ऑगस्ट १९९४ पृष्ठ ९०

१५. रंगराव बापू पाटील :- (झुली), झांजड, उनि पृष्ठ ९२

१६. डॉ.वासुदेव मुकाटे : ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास प्रकाशिका सौ. उषा मुलाटे, स्वरुप प्रकाशन अक्षर ८५८ सह्याद्रीनगर, एन-५ (दक्षिण) सिडको, औरंगाबाद ४३१ ००३ प्रथमावृत्ती जाने.१९९२ व्दितीयावृत्ती ऑगस्ट २००५ पृष्ठ २२३

१७. डॉ.वासुदेव मुलाटे : ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास, उनि पृष्ठ २२४


■ ■ ■



ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner